परिशिष्ट

(नमुना२)

जाक्र/शिविप्रा/खाशा/शाळामान्यता/ १९५८ /२०२२
कार्यालय,शिक्षण विभाग (प्राथ),जि.प.वाशिम.
दिनांक :- १७/८/२०२२

दुरध्वनी : ०७२५२ २३१०५२

ई मेल : ssawashim@yahoo.com

प्रति,

व्यवस्थापक
विद्यारंभ स्कुल कारंजा लाड

**विषय :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २००९ च्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम ११ पोटनियम (४)अन्वये शाळांना आर.टी.ई.मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

आपल्या दिनांक १७.५.२०२२ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेल्या पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे ,

मी , शिक्षणाधिकारी प्राथमिक , जिल्हा परिषद,वाशिम **१.४.२०२२ ते ३१.०३.२०२५** या कालावधीसाठी **इयत्ता ०१ ते ०८** करीता **विद्यारंभ स्कुल काळी कारंजा जि.वाशिम** या शाळेस आर.टी.ई.मान्यता देत आहे.

***वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे:***

१) ही मान्यता पुढे वाढणार नाही

२) शाळा.बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ (सहपत्र १ )आणि बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम.२००९ (सहपत्र २ )च्या तरतुदींशी बांधील राहील.

३) शाळा इयत्ता १ ली मध्ये मान्य विद्यार्थी संख्येच्या किमान २५ टक्के शेजारच्या परिसरातील दुर्बल घटकांतील आणि प्रतिकुल गटातील बालकांना प्रवेश देईल आणि त्यांचे प्राथमिक शिक्षणपूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत शिक्षण देईल.हाच निकष पूर्वप्राथमिक वर्गात प्रवेश देतांना पाळाला जाईल.

४) परिच्छेद ३ मध्ये नमूद बालकांच्या खर्च कलम १२ (२) प्रमाणे प्रतिपुर्तता केली जाईल. अशा प्रतिपुर्तिसाठी शाळा स्वतंत्र बँक खाते उघडेल.

५) शाळा/संस्था प्रवेशासाठी कोणत्याही प्रकारे,कॅपिटेशन फी आकारणार नाही आणि बालक अथवा पालकांना छाननी प्रक्रियेची सक्ती करणार नाही.

६) कोणत्याही बालकास वयाचा दाखला नाही म्हणून शाळा प्रवेश नाकारणार नाही,अथवा लिंग,धर्म,जात,जन्म ठिकाण या कारणांवर प्रवेश नाकारणार नाही.

७) शाळा पुढील बाबींची दक्षता घेईल :

एक) कोणतेही बालक कोणत्याही वर्गात नापास/थोपविले जाणार नाही अथवा त्याचे प्राथमिक शिक्षणपूर्ण होईपर्यंत शाळेबाहेर हाकलले जाणार नाही.

दोन ) कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा होणार नाही वा मानसिक छळ केला जाणार नाही.

तीन ) प्राथमिक शिक्षणपूर्ण करणाया प्रत्येक बालकांस सार्वजनिक बाहय परीक्षेस उत्तीर्ण होण्याची अट असणार नाही.

चार ) प्राथमिक शिक्षणपूर्ण करणाया प्रत्येक बालकांस नियम २३ खाली विहीत केलेले प्रमाणपत्र दिले जाईल.

पाच ) अधिनियमांच्या तरतुदीनुसार अपंग/विशेष गरजा असणारे बालकांचा समावेश केला जाईल.

सहा ) अधिनियमांच्या कलम २३.(१) मध्ये विहीत केल्यानुसारच किमान शैक्षणिक अर्हता असलेल्या शिक्षकांचीच नेमणूक केली जाईल.पुढे असे की ज्या शिक्षकांनी या अधिनियमांच्या अंमलबजावणी तारखेस जर किमान अर्हता प्राप्त केलेली नसेल तर ५ वर्षांच्या कालावधीत ते विहीत किमान अर्हता संपादन करतील.

सात ) शिक्षक कलम २४ (१) नुसार विहीत कर्तव्ये पार पडतील.

आठ ) शिक्षक खाजगी शिकवण्या घेणार नाहीत.

८) उचित प्राधिकरणाने विहीत केलेला अभ्यासक्रम अमलांत आणेल.